| MHAH030018962024 | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०९ | ०२ | २०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १६ | ०२ | २०२४ |
| निकाल दिनांक | : | ३० | ०१ | २०२६ |
| कालावधी | : | ०१ वर्ष | ११ महिने | २१ दिवस |

**भाग–अ**

**अहमदनगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.५, यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री. एम. एस. लुनिया यांचे समोर)**

(J.O.Code–MH03201)

पारीत दिनांक. ३०.०१.२०२६

CNR NO. MHAH030018962024

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १४३३/२०२४** **निशाणी ६ लगत**

| | |
|---|---|
| | गु. र. नं. –११५४/२०२३<br>तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर<br>ता.नगर, जि. अहमदनगर. |
| **फिर्यादी** | तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर |
| **सरकापक्षातर्फे** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. एच. वाळुंज व श्री. एस. एम. बेदरे |
| **आरोपी** | – **हरी आण्णा त्रिंबके,**<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा. नेप्ती, मारूती मंदिराशेजारी, अहमदनगर,<br>ता.जि. अहमदनगर. |
| **आरोपीतर्फे वकिल** | श्री. एन. व्ही. देशमुख. |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | १२/०८/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | १२/०८/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०९/०२/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २०/०६/२०२५ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | ३०/०६/२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | ३०/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | ३०/०१/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | निरंक |

## आरोपींचा तपशिल

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | आरोपी अटकेची दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचा तपशिल | निर्दोषमुक्त केले किंवा शिक्षा केली. | शिक्षा केली. | संपरिक्षेदरम्यान आरोपीचा फौ. क्र. सं. कलम ४२८ प्रमाणे शिक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हरी आण्णा त्रिंबके | फौ.प्र.सं. कलम ४१ अ १ नोटीस देण्यात आली. | २०.०६.२०२५ | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) | निर्दोष मुक्तता झाली. | -- | -- |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सतिष साहेबराव त्रिभुवन | फिर्यादी | ६ लगत |
| २. | संतोष परमेश्वर गर्जे | तपासी अधिकारी | ६ लगत |

**ब. बचावपक्ष साक्षीदार, जर असेल तर–**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल तरः**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**सरकारपक्ष/बचावपक्ष/न्यायालय यांनी दिलेल्या निशाण्या**

**अ. सरकारपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ८ | जप्ती पंचनामा |
| २. | ९ | फिर्याद |
| ३. | १२ | लेखी आदेश |
| ४. | १३ | मुद्देमाल पावती |
| ५. | १४ | रासायनिक तपासणी कामी केलेला पत्रव्यवहार |
| ६. | १५ | फौ.प्र.सं.कं लम ४१ अ १ ची नोटीस |

**ब. बचावपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ६ | दोषारोप |
| २. | ६ लगत | आरोपीचे फौ.प्र.संहिता कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन |

**इ. मुद्देमाल यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ३०.०१.२०२६ रोजी घोषित केले.)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे चालवण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –**

**२.** फिर्यादी सतिष साहेबराव त्रिभुवन यांची तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन नेमुणक होती. दिनांक १२.०८.२०२३ रोजी ते, पोहेकॉ संतोष गर्जे, पोकॉ शिरीष तरटे, पोकॉ गौतम

सातपुते असे तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये हजर असताना पोहेकॉ संतोष गर्जे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, १६ तोंडी कारंजा, अहमदनगर येथे एका टपरीच्या आडोशाला एक इसम हे बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची तयार दारुची चोरून विक्री करण्याच्या उद्देशाने कब्जात बाळगुन आहे, आता गेल्यास मिळुन येईल. त्यानंतर पोहेकॉ संतोष गर्जे यांनी दोन पंच यांना बोलावुन घेऊन बातमीतील हकीगत सांगितली व पंच म्हणुन सोबत येण्यास कळविले असता त्यांनी संमती दिल्यानंतर त्यांनी पोलीस स्टाफ व दोन पंच बातमीतील ठिकाणी खाजगी वाहनाने बातमीतील नमुद ठिकाणी गेले व अचानक सदर ठिकाणी १७.५० वाजता छापा टाकला असता तिथे एक इसम मिळुन आला. सदर इसमास ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव हरी आण्णा त्रिंबके, वय ३५ वर्ष, रा. मारूती मंदिराशेजारी, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर असे असल्याचे सांगितले. सदर घटना ठिकाणची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्या इसमाजवळ असलेल्या दोन पांढ–या रंगाच्या कॅनमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू किंमत रक्कम रु. ३३,००/– इतका मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालापैकी प्रत्येकी १८० मिलीचा एक नमुना केमिकल तपासणीसाठी काढुन घेवून त्यावर पंच व पोलीस यांच्या सह्यांचे लेबल लावून तो नमुना जागीच सीलबंद करण्यात आल्या. तसेच, झालेल्या कारवाईचा पंचांसमक्ष पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी रासायनिक तपासणी कामी राखुन ठेवलेल्या सिलबंद नमुना, उर्वरित मुद्देमाल व आरोपीस घेऊन पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक III १९५४/२०२३ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी

तपासादरम्यान साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले आणि गुन्ह्याचा इतर तपास केला. त्यांच्या तपासात आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर त्याचेविरुध्द निशाणी ०६ वर गुन्ह्याचा तपशिल नोंदविण्यात आला. सदर तपशिल आरोपीस त्याचे भाषेत समजावून सांगणेत आला असता त्याने गुन्हा नाकबूल करून खटला चालवण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. त्यानंतर आरोपीविरुध्द सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन निशाणी ०६ लगत नोंदविण्यात आले.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कर्षार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याचे उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक १२.०८.२०२३ रोजी १७.५० वाजताच्या सुमारास १६ तोंडी कारंजा, अहमदनगर येथे एका टपरीच्या आडोशाला आरोपीच्या ताब्यात दोन पांढ–या रंगाच्या कॅनमध्ये ३३ लिटर गावठी हातभट्टीची तयार | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | दारू किंमत रक्कम रु. ३,३००/- इतका मुद्देमाल त्यांच्या कब्ज्यात बाळगताना मिळुन आला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| २. | आदेश काय ? | **निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता** :-

७. आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने फिर्यादी सतिष साहेबराव त्रिभुवन (साक्षीदार क्रमांक १, निशाणी ६ लगत) व तपासी अधिकारी संतोष परमेश्वर गर्जे (साक्षीदार क्रमांक २, निशाणी ६ लगत) यांची साक्ष तपासली आहे.

८. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी सतिष साहेबराव त्रिभुवन (साक्षीदार क्रमांक १, निशाणी ६ लगत) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १२/०८/२०२३ रोजी ते पोलीस कॉन्स्टेबल या पदाव तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे कार्यरत होते. सदर दिवशी संतोष गर्जे यांना गुप्त माहितीदाराद्वारे माहिती मिळाली की, बारातोटी कारंजा, तोफखाना परिसर, अहमदनगर येथे एक इसम बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत आहे आता गेल्यास मिळुन येईल. त्यानंतर पंच यांना बोलावुन घेऊन बातमीतील हकीगत सांगितली व पंच म्हणुन सोबत येण्यास कळविले असता त्यांनी संमती दिल्यानंतर ते, पोहेकॉ संतोष गर्जे, पोकॉ सातपुते व कोतकर पंचांसह खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले. घटनास्थळी छापा टाकला असता तिथे एक इसम

विना परवाना गावठी हातभट्टीची दारू बेकायदेशीर रित्या विक्री करताना मिळून आला. सदर इसमास त्यांनी जागीच पकडून त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव हरी अण्णा त्रिंबके, रा. नेप्ती, मारूती मंदिराजवळ, नालेगाव असे असल्याचे सांगितले. सदर घटना ठिकाणची पंचांसमक्ष झडती घेतली असता घटनास्थळी ३३ लिटर हातभट्टीची दारू मिळून त्याची एकुण किंमत रक्कम रु. ३,३००/– इतका मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालापैकी १८० मिली मापाच्या काचेच्या स्वच्छ धुतलेल्या बाटल्या घेवून त्यामध्ये जप्त मुद्देमाल ताडीचा एक नमुना केमिकल तपासणीसाठी काढुन घेवून त्यावर पंच व पोलीस व आरोपीच्या सह्यांचे कागदी लेबल चिकटवून जागीच लाखसिल करण्यात आल्या. उरलेला मुद्देमाल जागीच नाश करण्यात आला. तसेच, झालेल्या कारवाईचा पोहेकॉ गर्जे यांनी पंचांसमक्ष जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ८) अन्वये केला. त्यानंतर त्यांनी रासायनिक तपासणी कामी राखुन ठेवलेल्या सिलबंद नमुना व आरोपीस घेऊन पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुतची फिर्याद (निशानी क्र. ९) अन्वये दाखल केली.

९. परंतु, फिर्यादी (सा.क्र. १) सतिष साहेबराव त्रिभुवन यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, फिर्यादमध्ये बातमी कोणत्या वेळी मिळाली याचा उल्लेख केलेला नाही, तसेच दोन पंचांची नावे त्यांनी फिर्यादमध्ये नमुद केलेले नाहीत, तसेच छापा टाकण्यापुर्वी ते कार्यालयातून किती वाजता निघाले हे फिर्यादीमध्ये नमुद केलेले नाही. तसेच त्यांनी बातमीची शहानिशा करण्यासाठी आरोपीकडे डमी गि–हाईक पाठविला नाही. घटनास्थळ हे रहदारीचे व वर्दळीचे ठिकाण आहे. सदर फिर्यादी पुढे असे मान्य करतात की, त्यांनी नमुना काढण्यासाठी वापरलेल्या बाटलीचे वर्णन तसेच मोजमाप फिर्यादमध्ये नमुद

केलेले नाही, तसेच त्यांनी ती बाटली चौकोनी, गोलाकर, व निमुळती असा उल्लेख फिर्यादीमध्ये केला नाही. तसेच त्यांनी त्या रिकाम्या बाटलीचा नमुना काढण्यापुर्वी त्या रिकाम्या बाटलीचा पंचनामा केलेला नाही. उर्वरित सर्व प्रश्नांची त्यांनी नकारात्मक स्वरुपात उत्तरे दिली.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासी अधिकारी संतोष परमेश्वर गर्जे (साक्षीदार क्रमांक २, निशाणी ६ लगत) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक १२/०८/२०२३ रोजी ते पोलीस हेडकॉन्स्टेबल म्हणुन तोफखाना पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना गु. रं. नं. ११५४/२०२३ याचा तपास लेखी आदेश (निशाणी १२) अन्वये त्यांच्याकडे देण्यात आला. सदर लेखी आदेशासोबत एफआयआर, दैनिक अहवाल, खबर, पंचनामा आणि ३३ लीटर हातभट्टीची दारूपैकी राखुन ठेवलेला १८० मि.ली. नमुना जप्त करुन देण्यात आल्या. त्यानंतर फिर्याद (निशाणी ९) दाखल करण्यात आली. त्यानंतर तपासादरम्यान जप्त मुद्देमालचा नमुना मुद्देमाल पावती (निशाणी १३) अन्वये पोलीस स्टेशनला जमा केला. त्यानंतर जप्त मुद्देमालापैकी १८० मि.ली. ची एक बाटली नमुना प्रयोगशाळेत नाशिक येथे रासायनिक तपासणीकरीता पत्र (निशाणी १४) अन्वये पाठविण्यात आली. परंतु त्या अनुषंगाने रासायनिक तपासणी अहवाल प्राप्त झाला नाही. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता ४१ अ १ प्रमाणे नोटीस (निशाणी १५) अन्वये देण्यात आली. तपासा दरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपी हे अवैधरित्या देशी विदेशी दारुची विक्री करताना मिळुन आल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**११.** परंतु, तपासी अधिकारी संतोष परमेश्वर गर्जे (साक्षीदार क्रमांक २, निशाणी ६ लगत) यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, जप्ती पंचनाम्यामध्ये जप्त मुद्देमालापैकी राखुन ठेवलेला नमुना ज्या बाटलीमध्ये काढून ठेवला होता त्या बाटलीचे वर्णन, आकार तसेच बाटलीच्या कंपनीचा उल्लेख नमुद केलेले नाही. तसेच मुद्देमाल पावतीमध्ये राखुन ठेवलेला १८० मिली बाटलीचा उल्लेख केलेला नाही. घटनेबाबत स्टेशन डायरीचा उतारा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच पोलीस कर्मचारी वगळता त्यांनी इतर कोणाचे जबाब नोंदविले नाहीत. घटनास्थळाच्या मालकी बाबतचा कागदोपत्री पुरावा त्यांनी हस्तगत केला नाही व इतर विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारात्मक स्वरुपात दिली आहे.

**१२.** फिर्यादी (सा.क्र.१) सतिष त्रिभुवन आणि तपासी अंमलदार संतोष गर्जे (सा.क्र.२) यांच्या उपरोक्त पुराव्याचे खंडण करण्याच्या अनुषंगाने बचाव पक्षाने दीर्घ उलटतपासणी घेतली. परंतु (सा.क्र.१) सतिष आणि (सा.क्र.२) संतोष यांचा छाप्यासंदर्भातील तसेच मुद्देमाल जप्ती संदर्भातील पुरावा अमान्य करावा अशी कोणतीही बाब उलटतपासणीमधून अभिलेखावर आली नाही.

**१३.** अभियोग पक्षातर्फे दाखल मौखीक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. अभियोग पक्षाच्या पूराव्यामध्ये असे आले आहे की, फिर्यादी यांनी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे घटना घडल्याचे शपथेवर सांगितले आहे. तसेच तपासी अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा तपास केला असून आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगीतले आहे. असे सांगीतले असले तरीही अभियोग पक्षाने तपासलेले दोन्ही साक्षीदार हे तोफखाना पोलीस स्टेशन,

अहमदनगर येथे कार्यरत असुन ते हितसंबंधीत साक्षीदार आहेत. तसेच अभियोगपक्षाला घटनेतील पंच साक्षीदार तपासण्याची पुरेशी संधी देण्यात आली परंतू, तशी संधी देऊन देखील अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदारांना तपासले नाही. तसेच अभियोगपक्षाने आरोपीवरील दोष सिध्द करण्याकरिता दोन पोलीस कर्मचारी सोडुन इतर साक्षीदार तपासलेले नाहीत.

१४. तसेच अभिलेखावर असे दिसते की, जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांसमक्ष ३३ लीटर गावठी हातभट्टीची तयार दारू अंदाजे किंमत रक्कम रु. ३,३००/– चा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई झाल्यामुळे सदर पंच हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदार साक्षीदार असल्याचे म्हणता येईल. त्यामुळे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांची मौखिक साक्ष अत्यंत महत्वाची ठरते. परंतु अभियोग पक्षातर्फे जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे केवळ फिर्यादी तसेच तपासी अंमलदार यांच्या साक्षीने जप्ती पंचनामा ख–या अर्थाने सिध्द झाल्याचे म्हणता येणार नाही. जप्ती पंचनामा ख–या अर्थाने त्यावरील स्वतंत्र पंच साक्षीदारांच्या पुराव्यानिशी सिध्द झाल्याशिवाय आरोपीच्या ताब्यातुन गावठी हातभट्टीची दारु जप्त करण्यात आल्याचे म्हणता येणार नाही.

१५. तसेच अभियोग पक्षातर्फे आरोपीच्या ताब्यातुन जी दारु जप्त करुन त्याचा नमुना रासायनिक पथृकरण अहवालासाठी पाठविण्यात आला या बाबत स्वतंत्र साक्षीदार म्हणजेच कॅरीयर अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आले नाही. त्यामुळे आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केलेली दारु हीच रासायननिक पथृकरणासाठी पाठविण्यात आली आहे असे सिध्द होउ शकले नाही. तसेच

अभियोग पक्षातर्फे जप्त केलेल्या दारुचा नमुना बाटलीमध्ये भरुन रासायनिक पथृकरणासाठी नाशिक येथील प्रयोगशाळेत पाठविली. परंतु त्याचा अहवाल प्राप्त झाला नाही व ती बाटली तीच असले बाबत स्वतंत्र साक्षीदार अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले नाही व तसेच अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदारांच्या साक्षीमध्ये तसे अभिलेखावर आले नाही. त्यामुळे रासायनिक पृथकरणासाठी जप्त केलेल्या दारूचा नमुना हा आरोपीच्या ताब्यातील जप्त दारु बाबतच आहे हे सिध्द होत नाही.

**१६.** उपरोक्त पार्श्वभूमीवर जप्त मुद्देमालाशी आरोपीचा संबंध निसंशयरित्या सिध्द झाला आहे का हे तपासणे आवश्यक व क्रमप्राप्त ठरते. या अनुषंगाने फिर्यादी सतिष (सा.क्र.१) आणि तपासी अंमलदार संतोष (सा.क्र.२) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, १६ तोंडी कारंजा, अहमदनगर येथे छापा टाकुन आरोपीच्या ताब्यातुन बेकायदेशीर रित्या ३३ लिटर दारु जप्त करण्यात आली होती व त्याचा जप्ती पंचनामा करण्यात आला होता. आरोपी मुद्देमालासह मिळुन आला याबाबत स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब अभिलेखावर येणे आवश्यक होते. परंतु अभियोग पक्षाने पोलीस साक्षीदार सोडुन स्वतंत्र पंच साक्षीदारांना तपासलले नाही. त्यामुळे मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केला याबाबत जप्ती पंचनामा शाबीत होत नाही. याशिवाय आरोपी हा जाणीवपुर्वक बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारु बाळगुन होता, ही बाब सिध्द होणे आवश्यक होते. परंतु फिर्यादी सतिष (सा.क्र.१) आणि तपासी अंमलदार संतोष (सा.क्र.२) यांचा सदर महत्वाच्या मुद्दयावरील पुरावा त्रोटक स्वरुपाचा आहे.

१७. तसेच मुद्देमाल दिनांक १२/०८/२०२३ रोजी जप्त करण्यात आला होता. जप्त मुद्देमालातील काही दारू एका रिकाम्या बाटली नमुना काढुन घेउन त्यावर पंचाचे सहीचे कागदी लाखसिल करुन, सदरचा मुद्देमाल रासायनिक तपासणी करिता दिनांक २०/०८/२०२३ रोजी पाठविण्यात आला. सदरच्या कालावधीत मुद्देमाल सुरक्षित ताब्यात होता किंवा कसे व तो कोणाच्या सुरक्षित ताब्यात होता, याबाबत अभियोग पक्षाने कोणताही पुरावा सादर केला नाही. या बाबींचा विचार करता जप्त मुद्देमालाशी आरोपीचा असणारा संबंध तसेच मुद्देमालाचा ताबा निःसंदिग्धपणे सिध्द झाला असे मान्य करता येणार नाही. तसेच जप्त मुद्देमालाचा नमुना रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविला त्याचा अहवाल देखील अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन आरोपीवरील दोषारोप निःसंदिग्धरित्या सिध्द झाले आहेत, असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे आणि त्या निष्कर्षास अनुसरून उक्त आदेश पारीत करीत आहे. त्यामुळे आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केले नाहीत. सबब मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u>**

१८. मुद्दा क्रमांक १ ची कारणमिमांसा आणि त्यावर आलेले निष्कर्ष पाहता आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केलेले नाहीत. सबब, आरोपी हा त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी **हरी आण्णा त्रिंबके** यांना महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार गुन्हा केलेचे आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार वैयक्तिक जात मुचलका द्यावेत. सदरचे वैयक्तिक जातमुचलका हे पुढील सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहतील. त्यानंतर ते आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)** |

MANGESH SUBHASH LUNIYA
Digitally signed by MANGESH SUBHASH LUNIYA
Date: 2026.01.30 16:52:56 +0530

**( एम. एस. लुनिया )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्रमांक ५, अहमदनगर.

दिनांक– ३०/०१/२०२६
अहमदनगर.